# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IES: २७००१-२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१५१ / १६१ / १७०

Email: secretary@msbte.com Web: www.msbte.org.in


जा.क्र.मरातंशिमं/D-५१/चाचणी/२०२३/ 6334 दिनांक:- 15 SEP 2023

**परिपत्रक**

**विषय : 'K' Scheme अभ्यासक्रमातील चाचणी परीक्षेच्या स्वरुपाबाबत.**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परीषद (AICTE) मान्यताप्राप्त महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा सुधारित अभ्यासक्रम ('K' Scheme) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने संस्थांकडून चाचणी प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपाबाबत वारंवार विचारणा केली जात आहे. तरी चाचणी परीक्षेच्या स्वरुपात एकसंगती राखण्याच्या दृष्टीने मंडळाकडून चाचणी परीक्षेकरिता दोन Question Paper Template खालील प्रमाणे देण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने संस्थेमध्ये विद्यार्थ्यांची चाचणी परीक्षा घेणे आवश्यक आहे. सदर बाब संबंधित विभागप्रमुख / अधिव्याख्यात्यांच्या तसेच विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्याची जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील.

**Question Paper Template - १**

Q.1 Attempt any five out of seven. (5 x 2 = 10) 2 Marks each

Q.2 Attempt any five out of seven. (5 x 4= 20) 4 Marks each

Or

**Question Paper Template - २**

Q.1 Attempt any three out of five. (3 x 4 = 12) 4 Marks each

Q.2 Attempt any three out of five. (3 x 6 = 18) 6 Marks each

चाचणी परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार करतांना खालील सूचनांचे पालन करावे.

१. प्रश्नपत्रिकेतील प्रश्नाचे वर्गीकरण व प्रमाण Specification Table मध्ये नमूद R, U, A वर आधारित असावे.
२. प्रश्नत्रिकेतील प्रश्न हे संबंधित विषयाच्या पाठ्यक्रमातील Course Level Learning Outcomes (COs) शी निगडीत असावे.
३. २० % प्रश्न हे विद्यार्थ्यांच्या बुद्धीस चालना देणारे असावे.
४. Objective Type, Fill in the Blanks व तत्सम प्रकारचे प्रश्न टाळावे. तसे प्रश्न देणे आवश्यक असल्यास १०% पेक्षा जास्त प्रमाणात नसावे.
५. ३० गुणांच्या चाचणी परीक्षेकरिता ९० मिनिटांचा कालावधी निर्धारीत केलेला आहे.
६. एका दिवशी एका सत्राच्या दोन पेक्षा जास्त विषयांची चाचणी परीक्षा घेण्यात येऊ नये.

(प्रमोद उ. वायसे)
प्र. सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

**प्रत :** मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:**

१) उपसचिव, म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय मुंबई/ पुणे/नागपूर/औरंगाबाद

२) उपसचिव (तां), कार्यासन क्र.४०, ४२, ४३, ४५ म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई